माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ-तक्रार क्र.बीएम-७६५/२०२४**

**अपिलार्थी श्री. मंगल एम काटवटे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-३ (पश्चिम)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन,
कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, रुम नं.५३७, ४ था मजला,
गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

| द्वितीय अपील आदेश दिनांक | तक्रार दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याकडून मागविण्यात आलेल्या अहवाल पत्र दिनांक | जन माहिती अधिकाऱ्यांचा अहवाल दिनांक |
|---|---|---|---|
| - | ११.११.२०२४ | ०६.०८.२०२६ | २४.०८.२०२६ |

तक्रारकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये आयोगाकडे दि. ११.११.२०२४ तक्रार दाखल केली आहे.

२. सदर तक्रार अर्जात त्यांनी असा उल्लेख केला आहे की, "मालाड पश्चिम चिंचवली बंदर, अनिस टॉवर सोसायटीजवळ खेळण्याची यंत्राची कामे सौंदयीकरण निधी वापरुन आमदार विद्या ठाकूर यांच्यावतीने झाले आहे. बील पास झाले त्याबाबत दि.०९.०२.२०२४ रोजी अर्ज देऊन माहिती मागितली आहे त्याचे उत्तर दि.०४.०३.२०२४ रोजी मिळाले. दिशाभूल करणारे मिळाल्यावर दि.१९.०३.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल करण्यास आली. अपीलाची सुनावणी दि.०५.०४.२०२४ रोजी मा. कार्यकारी अभियंता, पश्चिम यांच्या दालनात झाली त्याच्यामध्ये अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती १५ कार्यालयीन दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी परंतु आजपर्यंत कोणती ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यात आले नाही याच्यामध्ये माहिती अधिकाराचे उल्लंघन झाले. याबाबत दि.१५.०५.२०२४ रोजी मार्गदर्शन अर्ज देण्यात आले तरी ही माहिती देण्यात आली नाही म्हणजे येथे हम करे सो कायदा सुरु आहे. आपणांस विनंती आहे की, माहिती न देणारे मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे उप अभियंता / जन माहिती अधिकारी-३ यांच्यावर कलम १८ (१) अन्वये कारवाई करुन माहिती देण्याचे आदेश देण्यात यावा."

३. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता-३ यांच्याकडून दि.०६.०८.२०२६ च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला होता. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-३ (प) यांनी आयोगास दि.२४.०८.२०२६ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. त्याद्वारे त्यांनी खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

- तक्रारदार श्री. मंगल सु. काटवटे यांनी दि.०९.०२.२०२४ दिलेल्या अर्जानुसार "मालाड / प, चिंचोली बंदर, अहिंसा टॉवर सोसायटी जवळ, खेळण्याचे यंत्र व उद्यानाचे सौंदर्याकरण करणे." कामाबाबतची माहिती देण्याची मागणी केली होती.

- जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्र.३६४२ दिनांक २८.०२.२०२४ अन्वये तक्रारदार यांना "मालाड / प, चिंचोली बंदर, अहिंसा टॉवर सोसायटी जवळ, खेळण्याचे यंत्र व उद्यानाचे सौंदर्याकरण करणे." या कामांच्या नस्तीतील उपलब्ध कागदपत्रे स्कॅनिंगकरुन ठेवण्यात आलेले असून शासनाच्या नियामानुसार आपणांस माहिती सी.डी. स्वरुपात उपलब्ध करून देण्यात येईल. सदर सीडीची रक्कम रु.५०/- चा भरणा मुख्य लेखाधिकारी / मुं. झो. सु. मंडळ यांच्याकडे करावा. जेणेकरुन आपणांस माहिती उपलब्ध करून देण्यात येतील.
- तद्नंतर अर्जदार यांनी दि.१९.०३.२०२४ च्या अर्जानुसार प्रथम अपीलीय अधिकारी कार्यकारी अभियंता, पश्चिम विभाग, म्हाडाच्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांच्याकडे प्रथम अपील अर्ज सादर केला.तरी, मा. आयोगास विनंती करण्यात येते की, अर्जदाराचे पत्र व निम्नस्वाक्षरीकार यांचा खुलासा मान्य करुन तक्रार अर्ज निकाली काढावा ही विनंती.
- प्रथम अपील अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प), मुं. झो. सुधार मंडळ यांनी सदर अर्जावर दि.०४.०४.२०२४ रोजी सुनावणी घेतली.
- आदेश क्रं.८९८६ दि.०२.०५.२०२४ रोजीच्या प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार तक्रारदारास कळविले होते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास उपलब्ध असलेली माहिती योग्य ते शुल्क आकारून १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन दयावी असे आदेश दिले आहे.
- तक्रारदार यांनी कार्यालयास येऊन दि.०५.०६.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांना भेटुन माहिती उपलब्ध करुन घेतली आहे.

तरी मा. आयोगास विनंती करण्यात येते की, अर्जदाराचे पत्र व निम्नस्वाक्षरीकार यांचा खुलासा मान्य करून अर्ज निकाली काढावा हि विनंती.

४. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास अभिलेखावरील उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. त्यामूळे सदर प्रकरणात माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १८(२) अन्वये अधिक/ सखोल चौकशी करण्याची आवश्यकता नाही, असा निष्कर्ष काढून आयोग पुढील आदेश देत आहे :

**आदेश**

**उपरोक्त विवेचनासह तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 31-8-2026

**मुंबई**
**दिनांक : ३१.०८.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**